दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २५९ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.१४ डिसेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# माथेरानमध्ये खून करुन फरार झालेल्या आरोपीला अटक

**दै.रायगड नगरी । माथेरान**

**काल माथेरान मधील इंदिरा नगर येथे झालेल्या भीषण खुनाचा उलगडा माथेरान पोलिसांनी चोवीस तासांच्या आत लावला असून पतीनेच पत्नीची हत्या केल्याचे उघड झाले.**



काल येथील इंदिरा नगर येथील एका लॉज मध्ये एका स्त्रीचा नग्न अवस्थेत शीर नसलेला मृतदेह आढळून आला होता. त्यामुळे सर्वत्र खळबळ माजली होती ज्या पद्धतीने हा खून करण्यात आला होता. त्याने संपूर्ण जिल्हा हादरला होता. त्यामुळे जिल्ह्यातील संपूर्ण पोलीस यंत्रणा ह्या खुनाचा तपास करण्यासाठी सरसावली होती. स्वतः पोलीस अधीक्षक अशोक दुधे ह्यांनी माथेरान गाठून तपासाची सूत्रे हाती घेतली होती. त्यानुसार खुनाचा तपास करण्यासाठी ह्या परिसरातील संपूर्ण दऱ्या डोंगर छानण्यात आले व ह्याला यश मिळताना खोल दरीत एक रक्ताचे डाग असलेली लेडीज पर्स आढळून आली आणि ह्या पर्समुळेच हा खून उजेडात आला. पर्समध्ये एक चिठी सापडली होती ज्यामध्ये दादर येथील काही मजकूर होता.

माथेरानचे एपीआय संजय बांगर यांनी हा धागा पकडून तपासास सुरवात केली असता त्याची लिंक गोरेगाव मुंबई येथे एक महिला मिसिंग असल्याचे रिपोर्ट पर्यंत येऊन ठेपली. त्यावेळी तिथे आरोपी हाच आपली पत्नी गायब असल्याची तक्रार नोंदविण्यास आला होता. माथेरान पोलिसांनी त्याचे छायाचित्र व माथेरान मधील सीसीटीव्ही फुटेज चेक करून पाहिले असता दोन्ही इसम एकच असल्याचे दिसून आले तेव्हा पोलिसांनी त्यास जागीच अटक करून उशिरा रात्री माथेरानमध्ये घेऊन आल्यावर आरोपी राजीव पाल याने आपली पत्नी पूनम पाल हिचा खून केल्याचे कबुल केले व तिचे शीर, कपडे व खुनासाठी वापरलेले हत्यार जवळील खोल दरीत टाकल्याचे कबूल केले. त्यानुसार तपास केला असता खोल दरीमध्ये सदर महिलेचे शीर आढळून आले असून बाकीच्या वस्तूंचा शोध पोलीस उशिरा पर्यंत घेत होते.

आपल्या पत्नीचा खून करणारा राजीव पाल हा उच्च शिक्षित तरुण असून पनवेल येथे राहत होता तर त्याची मृत पत्नी पूनम पाल ही नर्सिंग चे शिक्षण घेत होती व गोरेगाव मुंबई येथे राहत होती मे महिन्यातच त्यांचे लग्न झाले होते. पण दोघांचे संबंध ठीक नसल्याचे तिच्या नातेवाईकांचे म्हणणे होते आरोपीने संशयावरूनच ही हत्या केली असावी असा अंदाज ही त्यांनी बोलून दाखविला सदर खुनाविषयी अधिक तपास माथेरान पोलीस करीत असून रायगड जिल्हा अधीक्षक अनिल घुळे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्जतचे डीवायएसपी विजय लगारे यांच्या समवेत माथेरानचे एपीआय संजय बांगर, ऐएसआय सांगळे, पो हवा अरविंद ठाकूर, पो हवा महेंद्र राठोड, पोशि गायकवाड, पोशि खतेले पुढील तपास करीत आहेत

# सलग दोन दिवस पेणमध्ये चोऱ्या ; पेण पोलिसांना चोरट्यांचे आव्हान

## तरणखोप येथील घरफोडीत पाच लाखाचा माल लंपास तर पेण शहरातील नऊ दुकाने फोडली




**दै.रायगड नगरी । पेण**

काल रात्री (११ डिसेंबर) पेण तालुक्यातील तरणखोप गावात घरफोडी झाल्यानंतर आज रात्री (१२ डिसेंबर) रोजी पुन्हा पेण शहरातील नऊ दुकाने चोरट्यांनी फोडल्याने पेण शहरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तरणखोप येथील झालेल्या घरफोडीत एकूण पाच लाखांचा मुद्देमाल तर पेण शहरातील फोडलेल्या दुकानांमधून अंदाजे २० ते २५ हजारांची रक्कम चोरट्यांनी लंपास केली आहे. या जबरी चोऱ्यांमुळे पेण पोलिसांना चोरट्यांनी आव्हान दिले आहे.

सविस्तर वृत्त असे की, तरणखोप गावातील व्यापारी रमेश गायकर हे आपल्या राहत्या घरात झोपले असताना काही अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या वेळी घरामध्ये घुसून तेरा तोळे सोने आणि दीड लाख रुपये रोख रक्कम असे एकूण पाच लाखाचा मुद्देमाल लंपास केला आहे. तर ही चोरी होते ना होते तोच सलग दुसऱ्या दिवशी म्हणजे १२ डिसेंबरच्या रात्री पेण शहरातील जालाराम मेडिकल, चावडी नाका येथील आईस्क्रीम व मोबाईल शॉपी, हिमालया प्रॉडक्ट्स, भोईर यांचे फरसाण अँड स्वीट मार्ट, डोमोलोज केक शॉप, स्वरा लेडीज वेअर, चिंतामणी जनरल स्टोअर, रिंगरोड जनरल स्टोअर्स, अवधूत मेडिकल ही नऊ दुकाने फोडून अंदाजे २० ते २५ हजारांची रक्कम लंपास केली आहे.

दरम्यान सलग दोन दिवस झालेल्या या चोरीच्या घटनांनी पेणमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून या झालेल्या चोऱ्यांबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी विभा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पेण पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ हे पुढील तपास करत आहेत.

# उरणच्या ओएनजीसी पीरवाडी हेलिपॅड जवळ पिस्टलसह दोन इसमांना अटक

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण पोलिसांनी ऑपरेशन ऑल आऊट दरम्यान शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास ओएनजीसी – पीरवाडी हेलिपॅड जवळ एका जीपमधून भारतीय बनावटीच्या पिस्टल एक राऊंड मॅगझिनसह दोन इसमांना अटक केली आहे.

उरण पोलिसांचे ऑपरेशन ऑल आऊट सुरू होते. वपोनि सचिन पाटील यांच्यासह पाच कर्मचाऱ्यांचे पथक मध्यरात्रीच्या सुमारास उरण ओएनजीसी प्रकल्पाच्या जवळच असलेल्या पीरवाडी हेलिपॅडवर पोहचले. या हेलिपॅडवर उभ्या असलेल्या महिंद्र कंपनीची थार कंपनीची काळ्या रंगाची .../२

## संक्षिप्त...

### राज्यात गेल्या २४ तासांत ५६९ नव्या कोरोनाबाधितांची नोंद

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात गेल्या २४ तासांत ५६९ नव्या कोरोनाबाधितांची नोंद झाली आहे. तर ५ जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच दिवसभरात ४९८ रुग्णांनी कोरोनावर मात केली असल्याची माहिती राज्यातील आरोग्य विभागाने दिली आहे.

राज्यात आतापर्यंत ६४ लाख ९३ हजार ००२ रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे. त्यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९७.७२ टक्के आहे. राज्यात आज पाच रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. राज्याचा मृत्यूदर २.१२ टक्के झाला आहे. राज्यात सध्या ६ हजार ५०७ रुग्णांवर उपचार सुरु आहेत. सध्या राज्यात ७४ हजार १९० व्यक्ती होम क्वॉरंटाईनमध्ये आहेत तर ८८७ व्यक्ती संस्थात्मक क्वारंटाईनमध्ये आहेत.

संपूर्ण जगामध्ये सध्या कोरोनाच्या ओमायक्रोन विषाणूचा धुमाकूळ सुरू आहे. राज्यातील ओमायक्रॉन बाधित रुग्णाच्या संख्येत दररोज वाढ होताना दिसत आहे. राज्यात आज दोन ओमायक्रॉनबाधित रुग्णांची नोंद झालेली आहे. यापैकी एक रुग्ण पुणे आणि एक रुग्ण लातूरमधील आहे. आतापर्यंत २० ओमायक्रॉनबाधितांची नोंद राज्यात झाली आहे. त्यापैकी ९ जणांना रुग्ण ओमायक्रॉनमुक्त झाले आहे.

दरम्यान, ब्रिटनमध्ये ओमायक्रॉन या व्हेरियंटची लागण होऊन एकाचा मृत्यू झाला आहे. ब्रिटनचे पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांनी याबाबत माहिती दिली आहे. त्यामुळे ओमायक्रॉन व्हेरियंटमुळे मृत्यू झालेल्या जगभरातील पहिल्या रुग्णाची नोंद आता झाली आहे. बोरिस जॉन्सन म्हणाले की, दररोज ओमायक्रॉनची लागण झालेल्या शेकडो लोकांना रुग्णालयात दाखल कराव लागत आहे. त्यातच आज कोरोनाच्या ओमायक्रॉन या नव्या व्हेरियंटमुळे एका रुग्णाचा मृत्यू झाला. त्यामुळे ३० पेक्षा अधिक वयाच्या लोकांनी कोरोना व्हॅक्सीनचा बुस्टर डोस घ्यावा, असं आवाहन बोरिस जॉन्सन यांनी केलं आहे.

# पडघे तसेच आजुबाजूच्या गावातील नागरिकांचा प्रश्न शिवसेनेमुळे मार्गी लागून स्थानिकांना मिळणार न्याय



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील पडघे तसेच आजूबाजूच्या गावांमधील शेतकऱ्यांच्या जमिनींचा सातबाऱ्यावर सिडकोच्या महसूल विभागाने १९७० मधे भुसंपादनाचे शिक्के मारले होते. ह्या जमिनींवर सदर शिक्क्यांमुळे कसल्याही प्रकारची विकासकामे शेतकऱ्यांना करता आली नाहीत. याबाबत त्यांनी शिवसेना जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील यांची भेट घेऊन त्यांच्यासमोर आपली कैफीयत मांडली.

त्यानुसार सदर विषय मा. म्हाडा अध्यक्ष, शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख सल्लागार व दि. बा. पाटील प्रकल्पग्रस्त समितीचे अध्यक्ष बबनदादा पाटील यांनी या संदर्भात महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन पत्रव्यवहार केला होता. त्याच विषयाच्या अनुषंगाने आज स्थानिकांसह रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर ह्यांची भेट घेऊन मुख्यमंत्री यांच्या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांचा हा महत्वाचा प्रश्न सोडवण्याची विनंती केली.

सदर विनंतीवर जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ सिडको व्यवस्थापकांशी तसेच पनवेल महानगरपालिका आयुक्तांशी फोनवर चर्चा करून स्थानिकांचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या सुचना केल्या त्यामुळे प्रलंबित असलेले अनेक प्रश्न मार्गी लागणार असल्याने शिवसेनेचे आभार मानले आहेत.

# तमाम भाविकांची श्रद्धा वाढीस लागो आणि महाराष्ट्राची वाटचाल सर्वांगीण विकासाकडे होवो : डॉ.नीलम गोऱ्हे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

तमाम भाविकांची श्रद्धा वाढीस लागो आणि महाराष्ट्राची वाटचाल सर्वांगीण विकासाकडे होवो, अशी प्रार्थना श्रीगणराया चरणी आहे, असे प्रतिपादन विधान परिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आज जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील अष्टविनायक क्षेत्र महड येथे केले.



अष्टविनायक क्षेत्रापैकी महड येथील सुप्रसिद्ध श्री गणेश मंदिरास भेट देण्यास आल्या असताना त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषद सदस्य किशोर जैन, रेखा ठाकरे, संतोष विचारे, गणपत पाटील,रेश्मा आंग्रे, अनिता पाटील देशमुख-दिसले, मा.उपसभापती कार्यालयाचे विशेष कार्य अधिकारी सचिन शिकलकर, स्वीय सहाय्यक योगेश जाधव व किरण शेवडे आदी मान्यवर उपस्थित होते.

विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे पुढे म्हणाल्या की, महड देवस्थान विकास कामासाठी आवश्यक निधीची तरतूद केली जाईल. महड फाटा ते महड देवस्थान अशा मार्गावर पथदिवे हायमास्क साठी रुपये पाच लाखाचा निधीही महड देवस्थान समितीला देण्यात येईल. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या कारकीर्दीला नुकतीच दोन वर्षे पूर्ण झाली असून महाविकास आघाडीचे शासन जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करीत आहेत. देवस्थान अष्टविनायक आराखड्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबरोबर चर्चा झाली असून अष्टविनायक देवस्थानच्या विकास आराखड्यांतर्गत लवकरच रस्त्यांची सुधारणा होण्याच्या दृष्टीनेही आवश्यक कार्यवाही केली जाईल. रस्त्यांची सुधारणा होण्यासंदर्भात विशेष लक्ष दिले जाणार आहे तर देवस्थानाला भेट देणाऱ्या भाविकांना चांगल्या प्रकारच्या सोयी-सुविधा उपलब्ध व्हायलाच हव्यात, असे सांगून डॉ. गोऱ्हे यांनी खोपोली पाली मार्गाच्या कामाबाबत नाराजी व्यक्त केली. यासंदर्भात पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांच्यामार्फत चौकशी करून या प्रकरणी पाठपुरावा करणार असल्याचेही त्या म्हणाल्या.तसेच पर्यावरण मंत्री आदित्यजी ठाकरे यांनी हा अष्टविनायक तीर्थक्षेत्र विकास आराखडा तयार करून देवस्थान विकास कामांसाठी आवश्यक निधी दिला असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

या भेटीदरम्यान डॉ. नीलम गोऱ्हे यांनी स्वतःच्या आमदार मानधनातून वैयक्तिक ११ हजार रुपयांची देणगी देवस्थान समितीचे केदार जोशी, मोहिनी वैद्य यांच्याकडे सुपूर्द केली.

# अखेर मुहूर्त सापडला! सोमवारपासून खोपोली सिटीबस रस्त्यावर

## काँग्रेसच्या आंदोलनाला आले यश ; नगराध्यक्ष यांची यशस्वी मध्यस्थी

**दै.रायगड नगरी । खोपोली**



वारंवार निवेदन देवूनही फक्त आश्वासन देणाऱ्या खोपोली नगर परिषद प्रशासनाने अखेर काँग्रेसच्या धरणे आंदोलनापुढे शरणागती पत्करीत सोमवार, दि. २० डिसेंबर २०२१ पर्यंत सिटीबस सुरू करण्याचा शब्द दिला आहे. त्यामुळे काँग्रेसकडून काही तासांतच आंदोलन मागे घेण्यात आले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, खोपोली नगर परिषदेच्या वतीने चालणारी सिटीबस पुन्हा सुरू करावी, अशी मागणी काँग्रेस पक्षाकडून करण्यात येत होती. मात्र, त्याला 'तारीख पे तारीख' मिळत असल्याने व सिटीबस सुरू करण्यास 'मुहूर्त' मिळत नसल्याने शहर अध्यक्ष रिचर्ड जॉन यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पार्टीकडून सोमवार दि. १३ डिसेंबर रोजी धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता, त्यानुसार दि. १३ रोजी सकाळी आंदोलन सुरू झाले. मात्र आंदोलनाला सुरू होवून काही तास उलटत नाही तोच नगराध्यक्षा सुमनताई औसरमल यांच्या दालनात काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांना बोलविण्यात आले. यावेळी मुख्याधिकारी अनुप दुरे, ज्येष्ठ नगरसेवक मोहन औसरमल आदी उपस्थित होते. संबंधित विषयावर समाधानकारक चर्चा झाल्यावर सोमवार दि. २० डिसेंबरपासून सिटीबस सेवा सुरू करण्याचा शब्द देण्यात आल्यानंतर धरणे आंदोलन मागे घेत असल्याची माहिती शहर अध्यक्ष रिचर्ड जॉन यांनी 'माध्यमां'शी बोलताना दिली.

आंदोलनात काँग्रेस शहर अध्यक्ष रिचर्ड जॉन, युवक शहर अध्यक्ष अँड. संदेश धावारे, महिला शहर अध्यक्षा रेखाताई जाधव, .../२

# पनवेल परिसरातील रेती उपसा करणाऱ्या माफियांवर कारवाई करण्याची ग्रामस्थांची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मागील वर्षभरापासुन पनवेल परिसरासह कोपरा खाडीत सुरु असलेला रेती उपसा सर्रास सुरु आहे.विशेष म्हणजे या रेती माफियांना कोणाचीच भीती राहिली नसून दिवसाढवळ्या देखील थेट खाडीत सक्शन पंप लावुन हा उपसा केला जात आहे.या अवैध्य उत्खननामुळे शासनाचा करोडो रुपयांचा महसूल तर पाण्यात जात आहेच त्या व्यतिरिक्त या खाडीवर उभारलेल्या रेल्वे व महामार्ग पुलाला मोठ्या प्रमाणात धोका निर्माण झाला आहे.



रेतीमाफियांना शासकीय पातळीवर महसूल विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा आशीर्वाद असल्यानेच रेती माफियांना कोणाचीच भीती राहिली नसल्याचे दिसून येत आहे.रात्रभर सुरु असलेल्या सक्शन पंपाच्या कर्कश आवाजाने खाडीकिनारी वास्तव्यास असलेल्या रहिवाशांना देखील मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे.वर्षभरात महसूल विभागाच्या माध्यमातुन याठिकाणी दोन ते तीन कारवाया करण्यात आल्या आहेत.मात्र या कारवाईत रेतीमाफिया व मुख्यसूत्रधारांना जाणून बुजून डावलण्यात आले.शासनाच्या महसूल विभागामार्फत अवैध्य उत्खनावर आळा घालण्यासाठी विविध .../२

# शिक्षण हक्काची पायमल्ली

दहा विद्यार्थ्यांपेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याची राज्य सरकारची भूमिका, शिक्षण हक्क कायद्याच्या (आरटीई) विरोधातील आहे. सहा ते चौदा वर्षे या वयोगटातील मुलांना त्यांच्या घराजवळच्या शाळांमध्ये शिक्षण घेण्याचा हक्क कायद्याने मिळाला असून, पटसंख्या नसल्याने अशा शाळा बंद करणे, म्हणजे त्यांचा हा हक्क हिरावून घेणे होय. दहापेक्षा कमी विद्यार्थी असलेल्या शाळा बंद करणे आर्थिक दृष्टीने व्यवहार्य आणि प्रशासनाच्या दृष्टीने सोयीचे ठरत असल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात त्यामुळे 'आरटीई'मागील हेतूंचा पराभव होणार आहे. यापूर्वीही राज्य सरकारने अशा प्रकारचा निर्णय घेतला, तेव्हा त्याला शिक्षणतज्ज्ञ आणि शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी विरोध केला. याआधी सत्तेवर असलेल्या फडणवीस सरकारने कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याची भूमिका घेतली, तेव्हा त्याला विरोध करणारे राजकीय पक्ष आज सत्तेवर आहेत. त्यावेळी त्यांनी ज्या कारणांनी विरोध केला, ती कारणे आताही तितकीच प्रस्तुत आहेत. वास्तविक, महाविकास आघाडी सरकारने ही भूमिकाच घ्यायला नको होती; परंतु अतिरिक्त खर्च टाळण्यासह अनेक कारणे देत शाळा बंद करण्याचे पाऊल उचलले जात आहे. बंद होणाऱ्या शाळांतील विद्यार्थ्यांना दुसऱ्या शाळांत जाण्यासाठी वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून देणार असल्याचे सांगितले जात आहे. नवीन शिक्षण धोरणात शाळा संकुलाची संकल्पना असून, ती याद्वारे साकारली जाणार असल्याचेही म्हटले जात आहे. शिक्षण सुविधांचा कमाल वापर होण्यासाठी शाळा संकुलाची संकल्पना मांडण्यात आली असली, तरी ती 'आरटीई'ला छेद देणारी आहे; त्यामुळे या तरतुदीचा आधार घेऊन शाळा बंद करणे चुकीचे आहे. कमी पटसंख्येच्या शाळा प्रामुख्याने ग्रामीण आणि दुर्गम भागांत आहेत. तेथील विद्यार्थ्यांना आधीच अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. तशाही स्थितीत त्यांचे शिक्षण सुरू आहे; शाळा जवळ असणे हे त्याचे प्रमुख कारण. ती बंद झाली आणि दूरच्या शाळेत सोय झाली, तर अनेकांचे, विशेषत: मुलींचे शिक्षण थांबण्याचा धोका आहे. त्यांच्यासाठी वाहतुकीची नि:शुल्क सोय केली, तरी तिला संपूर्ण प्रतिसाद मिळण्याची शक्यता कमी आहे; त्यामुळे शाळा बंद न करणे हेच व्यवहार्य ठरते. एकीकडे शिक्षणाच्या सार्वत्रीकरणाचा नारा द्यायचा, जन्मलेले प्रत्येक मूल शाळेत आले पाहिजे, अशी भूमिका घ्यायची आणि दुसरीकडे नजीकच्या शाळा बंद करण्याचे पाऊल उचलायचे, हा दुटप्पीपणा आहे. खासगीकरणामुळे शिक्षणाचे वस्तूकरण झाले असून, ज्यांच्याकडे पैसा त्यांना उत्तम शिक्षण, अशी स्थिती निर्माण झाली आहे. शिक्षण हे समानता निर्माण करणारे साधन असले, तरी त्याला आलेल्या बाजारू स्वरूपामुळे विषमता वाढत असल्याचे चित्र आहे. करोना साथरोगामुळे नाईलाजाने वापराव्या लागत असलेल्या ऑनलाइन शिक्षणामुळे विषमता वाढल्याचे निरीक्षण तज्ज्ञांनी नोंदविले आहे. अशा स्थितीत शाळा बंद करण्याने विषमता आणखी वाढण्याची शक्यता आहे. गेल्या दहा वर्षांत देशातील शालेय विद्यार्थ्यांमध्ये तीस लाखांहून अधिक घट झाल्याची आकडेवारी समोर आली आहे. करोनामुळे ही स्थिती ओढावली असे म्हणता येणार नाही; कारण विद्यार्थिसंख्येतील घसरण आधीपासूनच सुरू झाल्याचे याबाबतच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. शाळा बंद करणे किंवा शाळांचे समायोजन हे यामागील एक कारण असल्याचेही त्यात म्हटले आहे. शाळा बंद करण्यापूर्वी या आकडेवारीचा अभ्यास होण्याची गरज आहे. शालेय शिक्षणाबाबत ही भूमिका घेतली जात असताना, उच्च शिक्षणाच्या बाबतीत लवकरच आयोग नेमण्याचे आणि ऑनलाइन विद्यापीठ स्थापण्याचे जाहीर करण्यात आले आहे. ऑनलाइन शिक्षणाच्या मर्यादा साथरोगात ठळकपणे समोर आल्या आहेत. पायाभूत सुविधांच्या अभावापासून, प्रत्येक इयत्तेसाठी पुरेसा आशय नसणे आणि वर्गांतील शिक्षणाची अनुभूती न येण्यापासून संवाद खुंटणे आदी विविध कारणांमुळे ऑनलाइन शिक्षण परिणामकारक ठरत नसल्याचे मत तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य सरकार या तंत्रज्ञानाद्वारे स्वतंत्र विद्यापीठ उभारण्याचा विचार करीत आहे. डॉ. रघुनाथ शेवगावकर यांच्यासारख्या तज्ज्ञांची समिती यासाठी नेमण्यात आली आहे. ती सर्व बाबींचा साकल्याने विचार करेलच; परंतु स्वतंत्र ऑनलाइन विद्यापीठ उभारावे, की सध्याच्या विद्यापीठांत ऑनलाइन तंत्रज्ञानाच्या सुविधा निर्माण कराव्यात, याबाबत तिने दिशादर्शन करण्याची गरज आहे. मुक्त विद्यापीठांच्या स्थापनेनंतरही दूरशिक्षणासाठी विद्यार्थी पारंपरिक विद्यापीठांकडेच जात असल्याचा अनुभव याबाबत उपयुक्त ठरू शकेल. उच्च शिक्षण आयोग स्थापण्याची भूमिका योग्यच आहे; परंतु या आयोगाला पुरेसे काम न देण्यापासून, त्याने केलेल्या शिफारशींकडे दुर्लक्ष करण्यापर्यंतचे प्रकार यापूर्वी घडले आहेत. तसे आता होणार नाही, याचीही काळजी घेण्याची आवश्यकता आहे.

# आगरी कोळी कराडी उद्योजक असोसिएशनची स्थापना ; नोकऱ्या देणारे उद्योजक घडवण्याचा संकल्प



**दै.रायगड नगरी । उरण**

समाजामध्ये नवीन उद्योजक घडविणे, समाजातील पैसा समाजातच राहावा यासाठी प्रयत्न करणे, अधिकाधिक तरुणांनी फक्त नोकरीवर अवलंबून न राहता व्यवसायात उतरावे आणि त्यासाठी समाजामध्ये व्यावसायिक मानसिकता तयार करणे, व्यवसायासंबंधी प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेऊन नवीन उद्योजक घडविणे व त्यासाठी असणाऱ्या सरकारी योजनांची माहिती करून देणे, सहकारातून मोठे उद्योग तयार करणे इत्यादी अनेक संकल्प हातात घेऊन हाती घेत नव्या उदात्त भावनेतून आगरी कोळी कराडी उद्योजक असोसिएशनची स्थापना करण्यात आली आहे.

गेली अनेक वर्षे उद्योगात धडपड करत असलेली मंडळी या मध्ये सामील झाली आहे. व्यावसायिक, उद्योजक का घडत ना-हीत हे आम्ही जवळून पाहिला आणि अनुभवल आहे. समाजातील तरुणांना व्यवसाय आणि उद्योग क्षेत्रात मार्गदर्शनाची, व्यवसायिक संधी ची आणि त्यासाठी उपयुक्त असलेल्या कौशल्यांची आणि भांडवल कसे उपलब्ध होईल या सर्वांची माहिती करून देणे आवश्यक आहे. आणि हेच शिवधनुष्य आगरी कोळी कराडी असोसिएशनने पेलण्याचे ठरवले आहे. आगरी कोळी कराडी समाजातील कोणताही व्यवसायिक किंवा नवउद्योजक यामध्ये सहभागी होऊ शकतो असे संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हास्यप्रबोधनकार संजीवन म्हात्रे यांनी सांगितले.

या संकल्पनेला 'कोविड काळात' विशेष अमलात आणणे शक्य होत नव्हते. परंतु प्रयत्न सतत सुरू होते अखेर ५ डिसेंबर च्या पहिल्याच सभेत ४५ उद्योजकांनी सहभाग घेतला. आणि तीनच दिवसात ही संख्या ६५ वर गेली आहे.संघटनेचे उद्दिष्ट २०२२ मध्ये पाचशे उद्योजक तयार करणे आणि ५० हजार लोकसंख्येचा ग्राहक मंच तयार करणे आहे. अशी अनेक ध्येय आगरी कोळी कराडी उद्योजक असोसिएशने ठेवली आहेत.

आपल्याला यामध्ये व्यावसायिक किंवा उद्योजक म्हणून सहभागी व्हायचं असेल तर जरूर पुढे दिलेल्या क्रमांकावर संपर्क करा. आणि जर आपण उद्योजक व्यावसायिक नसाल परंतु आपल्या समाजातील तरुणांनी उद्योगात यावे, समाजातील उद्योग भरभराटीस यावे असे वाटत असेल तर आपण आगरी कोळी कराडी उद्योजक असोसिएशन च्या फेसबुक पेज ला जरूर लाईक करावे.

आपण ग्राहक म्हणून सुद्धा या संघटनेत आपण सामील होऊ शकता ! चला तर मग उद्योजक घडवूया एका समृद्ध समाजाची निर्मिती करू या आणि आता नोकऱ्या देणारे होऊया असे आवाहन आगरी कोळी कराडी उद्योजक असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष हास्यप्रबोधनकार संजीवन म्हात्रे आणि त्यांचा टीमने केले आहे.

# नगरपंचायत निवडणूक अर्ज मागे घेण्याची वेळ संपली आता प्रचाराचा घुमशान

**दै.रायगड नगरी । तळा**

गेल्या आठ दिवसांपासून उमेदवारी मिळण्यासाठी सुरू असलेली सेटिंग त्यानंतर अर्ज भरण्यासाठी सुरू झालेली धडपड. नंतर अर्ज मागे घेण्यासाठीची मनधरणी अमिषांचं गाजर अशा सर्व गोंधळात अखेर आज अर्ज मागे घेण्याची वेळही संपली आहे. त्यामुळे आता नगरपंचायत निवडणुकीचा शहरभर धुरळा उडणार आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने सख्खे मित्रं, नातेवाईक, कुटुंबातील सदस्य एकमेकांच्या विरोधात लढतानाचे चित्रंही दिसणार आहे. काही ठिकाणी दुरंगी, तिरंगी तर काही ठिकाणी थेट चौरंगी लढत पाहायला मिळणार असून या निवडणुकीत कोण बाजी मारणार? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागलं आहे.

आज नगरपंचायत निवडणुकीसाठी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता. त्यामुळे अनेक पक्षांनी आणि स्थानिक पातळीवरील नेतृत्वाने शेवटच्या क्षणापर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी उमेदवारांची मनधरणी केली. त्यात काही ठिकाणी यश आले तर काही ठिकाणी अपयश आले. त्यामुळे शहरातील अनेक भागात निवडणुका अटळ झाल्या आहेत या निवडणुकीत ३ अर्ज मागे घेण्यात आले आहेत प्रभाग क्रमांक ७ मध्ये जोगवाडी पोळेकर मंगेश अपक्ष शिवसेना पुरस्कृत बिनविरोध निवड झाली आहे.

४ प्रभागात तिरंगी ५ प्रभागात दुरंगी ४ अशा चुरसीच्या लढती होणार आहेत. १२ प्रभागात शिवसेना, राष्ट्रवादी,भाजपा , शेकाप, बहुजन समाज पार्टी, वंचित बहुजन आघाडी,व अपक्ष उमेदवारांमधे चुरसीच्या लढती होणार आहेत.

# १५ हेक्टर पाणथळी क्षेत्रात दगड मातीचा भराव, तहसीलदाराने रॉयल्टी वसूल करण्याची उरणकरांची मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील करळ – सावरखार ग्रामपंचायत हद्दीतील जेएनपीटीच्या १५ हेक्टर पाणथळी क्षेत्रात दगड मातीचा भराव करण्यात आला आहे. जलकुंभावर मोठ्या प्रमाणावर सुरू असलेले माती–दगडाच्या भरावाचे काम उरण तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांनी रविवारी (दि१२) बंद केले आहे.तरी उरण तहसीलदारांनी सदर भरावा संदर्भात रॉयल्टी वसूल करावी अशी मागणी उरणच्या जनतेनी केली आहे.

करळ – सावरखार ग्रामपंचायत हद्दीतील जेएनपीटी येथील १५ हेक्टर पाणथळी क्षेत्रात जलकुंभावर मोठ्या प्रमाणावर माती–दगडाच्या भरावाचे काम सुरू केले आहे. जलकुंभांवर दररोज शेकडो ट्रक माती दगड टाकला जात आहे.या भरावात स्थलांतरित पक्ष्यांची आश्रयस्थाने नष्ट होऊ लागली.तसेच मासेमारीसाठी पाण्याचा प्रवाहाच्या खाड्यांची मुखही बंद केली जात आहेत. परिणामी परिसरातील पाणथळ जागा दफन केल्याने येथील नाजूक पर्यावरणीय समतोल बिघडला आहे. तसेच स्थलांतरित आणि स्थानिक पक्ष्यांना घरटी बांधण्यासाठी आणि लँडिंगसाठी संघर्ष करावा लागत आहे. शिवाय खाड्याची मुखे बंद केली जात असल्याने सदर गावात अधूनमधून समुद्राचे पाणी शिरत आहे. भरावामुळे पाण्याचा प्रवाह रोखला जात असल्याने पारंपरिक मासेमारीही धोक्यात आली आहे.या भरावामुळे स्थलांतरित पक्ष्यांची आश्रयस्थाने नष्ट होऊ लागली असल्याने पर्यावरणवाद्याकडून चिंता व्यक्त करत मुख्यमंत्री, पर्यावरण विभागाकडे ई–मेलव्दारे तक्रार करण्यात आली होती.

रविवार दि १२ डिसेंबर रोजी उरण तह–सीलदार भाऊसाहेब अंधारे यांनी या स्थळाची पाहणी केली. करळ– सावरखार ग्रामपंचायत येथील जेएनपीटीच्या १५ हेक्टर पाणथळी क्षेत्रातील जलकुंभावर मोठ्या प्रमाणावर सुरू असलेले माती–दगडाच्या भरावाचे काम पाहणीनंतर बंद केले असल्याची माहिती उरण तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांनी दिली. तरी उरण तहसीलदारांनी सदर भरावा संदर्भात रॉयल्टी वसूल करावी अशी मागणी उरणच्या जनतेकडून करण्यात येत आहे.

# व्हेंचर फाऊंडेशनतर्फे अंधेरी (पश्चिम) वर्सोवा येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या व्हेंचर फाऊंडेशनतर्फे मुंबई– अंधेरी (पश्चिम) येथील सात बंगला वर्सोवा समोर जोसेफ पटेल वाडीतील मीना बिल्डिंग येथे रविवार दि.१२डिसेंबर २०२१ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० या वेळेत संस्थापक अध्यक्ष विक्रांत राऊळ यांच्या अध्यक्षतेखाली मान्यवरांच्या उपस्थितीत मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले या शिबिराचा पन्नासहून अधिक जणांनी लाभ घेतला.

व्हेंचर फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विक्रांत राऊळ, राष्ट्रीय सचीव अल्ताफ सय्यद,राज अग्रवाल, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सामाजिक न्याय विभाग मुंबई अध्यक्ष सुनील शिंदे, उपाध्यक्ष समाधान गोविंद, अंधेरी (पश्चिम) अध्यक्ष संजय भक्ता,मेहेबूब शेख, वर्सोवा तालुका अध्यक्ष प्रकाश हतीसकर, अंधेरी (उत्तर–पश्चिम) अध्यक्ष शरद कांबळे,तज्ञ डॉ.सईदा सिद्दिकी, सदस्य, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.यावेळी तज्ञ डॉ. सईदा सिद्दिकी व त्यांच्या टिमने अंधेरी पश्चिम वर्सोवा भागातील लोकांची आरोग्य तपासणी केली.यामध्ये ताप, मधुमेह,रक्तदाब व साधारण तपासणी करण्यात आली.यावेळी व्हेंचर फाऊंडेशन तर्फे रुग्णांना मोफत औषध वाटप करण्यात आले.याचा आजुबाजुच्या परिसरातील पन्नासहून अधिक रुग्णांनी लाभ घेतला.

गेल्या सात वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात सक्रिय सहभाग असलेल्या व्हेंचर फाऊंडेशनचा संपूर्ण भार–तात विस्तार करण्यात येणार येणार असून सदस्य नोंदणी प्रगतीपथावर आहे.देशात एक हजार आरोग्य शिबिराचे उद्दिष्ट असून आतापर्यंत साठहून अधिक शिबिरे घेण्यात आली आहेत.शालेय विद्यार्थ्यांना मोफत वह्या पुस्तके वाटप,फी मध्ये सवलत, गोरगरिबांना औषधे तसेच वकिलामार्फत कायदे विषयक प्रश्न सोडविण्यात प्रयत्नशील राहणार असल्याचे विक्रांत राऊळ यांनी यावेळी सांगितले.

# सुधागड तालुका राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे महिलांचा सन्मान

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त रविवारी (ता.१२) पालीतील मराठा समाज सभागृहात सुधागड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. तसेच विविध योजनांची माहिती देण्यात आली. यावेळी मुंबई येथून काढण्यात आलेल्या व्हर्चुअल रॅलीत मान्यवर व उपस्थित सहभागी झाले. या कार्यक्रमात संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी निराधार योजना, श्रावण बाळ निराधार योजना यांची माहिती दिली गेली. हा कार्यक्रम राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला प्रदेश अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या आदेशानुसार रायगड जिल्हा निरीक्षक रूपाली दाभाडे व रायगड जिल्हा अध्यक्षा गीता पालरेचा यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. कार्यक्रमास यांच्यासह तालुका अध्यक्षा रूपाली भणगे, पंचायत समिती सदस्या साक्षी दिघे, पाली शहर अध्यक्षा सुजाता वडके, आशा शिर्के, वाफेघर सरपंच रुचिता बेलोसे व सुनंदा देशमुख यांच्यासह मान्यवर व महिला उपस्थित होत्या.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## उरणच्या ओएनजीसी पीरवाडी हेलिपॅड जवळ पिस्टलसह दोन इसमांना अटक

एमएच –०२–ईयु– ५२९४ क्रमांक असलेली जीप उभी होती. त्यामध्ये समोर दोन इसम व पाठीमागील सीटवर एक महिला तिच्या मुलासह बसलेली होती. ड्रायव्हिंग सीटवर बसलेला इसम नील मुन्ना राजभर (३५) रा.वारिक आळी –नागाव उरण याची वपोनि सुनील पाटील यांनी चौकशी केली.मात्र चौकशीत तो समाधानकारक उत्तरे देऊ शकला नाही. त्याशिवाय त्यांच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने त्याची पोलिसांनी अंग झडती घेतली असता त्याच्या कमरेला एक काळ्या रंगाचे लोखंडी धातूचे भारतीय बनावटीचे पिस्टल मिळून आले. मात्र त्यात मॅगझिन नव्हते. बाजूच्या सीटवर बसलेला त्याचा मित्र राज थळी (३२) रा.काठेआळी नागाव–उरण याचीही अंगझडती घेतली असता त्याच्या जिन्स पॅन्टच्या खिशात पिस्टलचे मॅगझिन मध्ये एक जिवंत राऊंड आढळून आले. सदर पिस्टलची मॅगझिनसह किंमत अंदाजे रु.२५ ,०००/– व जीपची किंमत अंदाजे रु. ९ ,०० ,०००/– असे एकूण ९,२५ ,०००/– रुपये किंमतीचा मुद्देमाल ताब्यात घेऊनउरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करुन दोन्ही इसमाना अटक केली आहे.चौकशीत त्यांच्याकडे पिस्टल बाळगण्याचा परवाना नसल्याचे उघडकीस आले आहे.पिस्टल कुठून व कशासाठी आणले याचा कसून तपास पोलिसांकडून केला जात आहे.

## अखेर मुहूर्त सापडला! सोमवारपासून खोपोली सिटीबस रस्त्यावर

प्रसिद्धी प्रमुख पत्रकार सागर जाधव, शिळफाटा अध्यक्ष महेमूद शेख, इंटक शहर अध्यक्ष अरूण गायकवाड, अल्पसंख्यक सेल शहर अध्यक्ष सईद शेख, विनोद सरज, काँग्रेस सेवा दलचे महेराज शेख, महिला उपाध्यक्ष ममता पांडे, प्रिया जोगदंड, शरीफा शेख, रिहाना शेख, अस्मिता साळुंखे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माफियांवर कारवाई करण्याची ग्रामस्थांची मागणी

उपाययोजना राबविल्या जातात.तहसीलदारांना अशाप्रकारे रेतीमाफियांवर कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत.मात्र पनवेल मध्ये शासनाचा करोडो रुपयांचा महसूल वाया जात असताना पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर याबाबत कारवाई करण्यास टाळाटाळ का करीत आहेत ? हा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे.महसुल विभागाशी संगनमत करून शासनाचा करोडो रुपयांचा महसूल बुडवला जात नाही ना ?असाही प्रश्न उद्भवत आहे. कोपरा खाडीत असलेला रेल्वे पुल ,सायन पनवेल महामार्गावरील पुल दोघांना उत्खननाचा धोका निर्माण झालेला असताना शासकीय यंत्रणा सर्रास अशाप्रकारे सुरु असलेल्या अनधिकृत उत्खनन करणाऱ्या रेती माफियांना पाठीशी घालत आहेत हि आश्चर्याची बाब आहे. तरी शासनाने लक्ष घालून या रेती माफियांविरोधात कारवाई करावी अशी मागणी जोर धरीत आहे.

# अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालय येथे डोळयाचा तिरळेपणा व अस्थिव्यंग शस्त्रक्रिया शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

येथील जिल्हा रुग्णालय येथे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम, डि.ई.आय.सी. कार्यक्रम व एस.आर.सी.सी. हॉस्पिटल, मुंबई तसेच सत्य साई संजीवनी हॉस्पिटल, खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने डोळ्यांचा तिरळेपणा व अस्थिव्यंग शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन शनिवार, दि. ११ डिसेंबर, २०२१ रोजी करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये डोळयांचा तिरळेपणा या आजारासंबंधी एकूण ३१ बालक/विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी २३ बालक/विद्यार्थी यांना पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले आहे. तर अस्थिव्यंग आजाराकरिता एकूण २८ बालक/विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी १३ बालक/विद्यार्थी यांना शस्त्रक्रियेकरीता संदर्भित करण्यात आले आहे.

या लाभार्थ्यांच्या शस्त्रक्रिया एस.आर. सी.सी. हॉस्पिटल, मुंबई येथे राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत मोफत करण्यात येणार आहेत.

या शिबिराकरिता एस.आर.सी.सी. हॉस्पिटल,मुंबई येथील डॉ.जयदीप धमाले, बाल अस्थिरोग तज्ञ व डॉ.नहाल, अस्थिरोग तज्ञ व डॉ. रत्नदीप, डॉ. निर्मित यांच्यासह जनसंपर्क अधिकारी श्री. योगेश खाचणे, जिल्हा सामान्य रुग्णालयातील डि.ई.आय.सी. मॅनेजर श्री.गणेशकुमार भोसले, आरबीएसके समन्वयक श्री. सुनिल चव्हाण, सामाजिक कार्यकर्ता श्री.साहिल म्हात्रे तसेच ऑप्टोमेट्रिस्ट श्रीम. ऐश्वर्या थळे तसेच आरबीएसके पथकातील वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

हे शिबीर यशस्वी होण्याकरिता जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रमोद गवई, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. गजानन गुंजकर, अधिसेविका श्रीम. जयश्री मोरे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. चेतना पाटील, जिल्हा लेखा व्यवस्थापक श्री. संतोष पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# 20 लाखांच्या ट्रकची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

२० लाख रूपये किंमतीच्या टाटा कंपनीच्या १४ चाकी ट्रकची चोरी चालकाने केल्याची घटना पनवेल तालुक्यातील अजिवली गावाच्या हद्दीतील एचपी पेट्रोल पंपाच्या बाजूला घडली आहे.

विनोद पवार यांच्या ट्रक क्र.एमएच १३ एएक्स ४१०९ यावर चालक म्हणून काम करणारा अजिम सलीमखी पठाण याने २० लाख रूपये किंमतीचा १४ चाकी ट्रक सदर ठिकाणी उभा केला असता मालकाची फसवणूक करून त्याने तो ट्रक चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## रस्त्यावर अश्लिल हावभाव करणाऱ्या चार जणींविरूद्ध पनवेल शहर पोलिसांची कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या पादचारी लोकांना विभत्स चाळे, अश्लिल हावभाव व हातवारे करून असभ्य लज्ञास्पद वर्तन करणाऱ्या चार जणींविरूद्ध पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे.

पनवेल एसटी स्टँड परिसर त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग आदी ठिकाणी मोठ्या प्रमाणात काही महिला सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर उभे राहून ये-जा करणाऱ्या पादचारी लोकांना विभत्स चाळे, अश्लिल हावभाव व हातवारे करून असभ्य लज्ञास्पद वर्तन करतात याबाबतच्या तक्रारी विविध महिला संस्थांनी व संघटनांनी पनवेल शहर पोलिस ठाण्याचे वपोनि विजय कादबाने यांच्याकडे केल्या होत्या. त्यानुसार पनवेल शहर पोलिसांचे पथक व अ.मा.वा.प्र.कक्ष, गुन्हे शाखा आदींनी एकत्र येऊन वेगवेगळ्या ठिकाणी कारवाई करीत चार महिलांना ताब्यात घेतले आहे व भा.दं.वि. कलम २९४, ३४ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

## मुंढाणी येथील प्रसिद्ध मूर्तीकार हिराचंद कुथे यांचे अपघाती निधन

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्याजवळील शिहू विभागातील मुंढाणी गावातील प्रसिद्ध मूर्तीकार व सामाजिक कार्यकर्ते हिराचंद चांगू कुथे यांचे (वय ५२) यांचे नुकतेच एका अपघातात निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, पोलिस खात्यात कार्यरत असलेला विवहित मुलगा आकाश, भाग्येश, विवाहित मुलगी सौ. ममता शिंदे, सुन, जावई, नातवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे.



दिवंगत हिराचंद कुथे हे शिहू विभागात मूर्तीकार म्हणून प्रसिद्ध होते. गावातील सामाजिक, धार्मिक कार्यात ते नेहमी हिरिरीने सहभाग घेत असत. त्यांच्या मनमिळाऊ स्वभावामुळे त्यांचा लहान-थोर, गोर-गरीब सर्वांमध्ये मोठा मित्रपरिवार होता. कै. हिराचंद कुथे यांच्या अकाली निधनाने मुंढाणी व शिहू विभागात सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान हिराचंद कुथे यांच्या निधनाचे वृत्त समजताच विधानपरिषदेचे आमदार अनिकेतभाई तटकरे यांनी त्यांच्या निवासस्थानी येऊन कुथे कुटूंबियांचे सांत्वन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे विभागीय नेते भाई टके, दिलिप शिंदे, उदय जवके, विनायक गोळे, रिलायन्सचे जनसंपर्क अधिकारी रमेश धनावडे आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कै. हिराचंद कुथे यांचे दशक्रिया विधी सोमवार दि. २० डिसेंबर रोजी उध्दर येथे तर उत्तरकार्य गुरूवार दि. २३ डिसेंबर रोजी मुंढाणी येथील त्यांच्या राहत्या घरी होणार असल्याचे कुथे कुटुंबियांकडून सांगण्यात आले.

## मेढा येथे श्री दत्तजयंती उत्सव निमित्त धार्मिक कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहा तालुक्यातील मेढा येथे सालाबाद प्रमाणे मार्गशीर्षय शुद्ध पौर्णिमा शनि.दि.१८ डिसें. २०२१ रोजी श्री दत्तजयंती उत्सव साजरा होत आहे .

यानिमित्ताने शुक्र. दि. १७ रोजी दुपारी ४ ते ६ वा. महिलांचा हळदी कुंकू समारंभ , संध्याकाळी ६ वा. हरिपाठ मेढा विभाग पंचक्रोशी वारकरी संप्रदाय , रात्री ७ वा वारकरी संप्रयदायासाठी भोजन अन्नदाते - निखिल नंदकुमार पवार , रात्री ९ वा कीर्तन ह भ प कीर्तनकार दिनेश पाटील महाराज डोळवी सोबत मेढा विभाग पंचक्रोशी वारकरी संप्रदाय , शनिवार दि १८/१२/२०२१ रोजी पहाटे ४ . ३० वा काकडआरती दत्तआळी महिला मंडळ सकाळी ७ वा . श्री दत्तगुरु महा पूजा सौ श्री रमेश शेठ जैन व म्रिश्रीमलं शेठ गौरीदास जैन रोहा यांच्या शुभ हस्ते सकाळी ९ वा श्री दत्तगुरु जन्मोत्सव सकाळी ११.०० - दु. २.०० महाप्रसाद अन्नदाते गिरीश नथुराम मोरे व दत्त भक्त सहकारी , दुपारी १२ ते १ भजन दत्त आळी ग्रामस्थ भजन मंडळ मेढा , दु. २ - ४ कीर्तन ह भ प श्री बलकावडे महाराज आमडोशी सोबत मेढा विभाग पंचकोशी वारकरी भजन मंडळी संध्याकाळी ६ ते रात्री १२ श्री दत्तगुरु पालखी मिरवणूक आदी कार्यक्रम संपन्न होणार आहेत .तर रविवार दिनांक १९/१२/२०२१ रोजी सकाळी ११ वा विद्यार्थी गुण गौरव व सत्कार प्रमुख उपस्थिती दत्तात्रेय दाईटकर मुंबई , शनिवार दि १८/१२/२०२१ रोजी रात्री १० वा वारकरी संप्रदाय भोजन अन्नदाते श्री गुरुदेव दत्त मित्र मंडळ मुंबई ठाणे पनवेल , रविवार १९/१२/२०२१ रोजी १२ ते ४ सामुदायिक महाप्रसाद अन्नदाते श्री मिश्रीमाळशेठ गौरीदास जैन रोहा आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे .

तरी सर्व भाविकांनी कार्यक्रमास कुटुंबियांसह व इष्ट मित्र मंडळींसह उपस्थित राहून श्री सद्गुरुंच्या दर्शनाचा आणि प्रसादाचा लाभ घ्यावा असे विनंम्र आव्हान श्री दत्तजयंती उत्सव समिती दत्त आळी मेढा अध्यक्ष किशोर पोळेकर गुरुजी उपाध्यक्ष श्रीकांत दाइटकर सेक्रेटरी संतोष सतवे उपसेक्रेटरी राजेश घरट खजिनदार विजय मोरे उप खजिनदार निलेश निवळे सदस्य प्रकाश मोरे सदस्य अभिजित खरपुडे सदस्या यमुना खैरे सदस्या अश्विनी मोरे सदस्य रंजन निवळे सदस्य भरत सतवे सदस्य मोहन खैरे मेढा ग्रामपंचायत उपसरपंच उदय मोरे ग्रामपंचायत सदस्या नम्रता सुतार ग्रामपंचायत सदस्या समिधा जवके तसेच ग्रामस्थ मंडळ श्री गुरुदेव दत्त मित्र मंडळ ठाणे पनवेल, महिला मंडळ , नवतरुण मंडळ, दत्त आळी मेढा यांनी केले आहे .

# दिवेआगरला गणेशभक्तांची मांदियाळी ; श्री सुवर्णगणेश मुखवट्याच्या दर्शनासाठी भविक व पर्यटकांची पसंती

**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी - रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यात दिवेआगर येथे अंगारकी चतुर्थीचे औचित्य साधून बुधवारी ता. २३ रोजी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार व त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्या हस्ते दिवेआगर येथील सुवर्ण गणेश मूर्तीच्या मुखवट्याची पुनः प्रतिष्टापना पूजा संपन्न झाली. त्यानंतर श्री गणेश मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची अलोट गर्दी दिसू लागली आहे.



गुलाबी थंडीची चाहूल लागलेली असतानाच पर्यटकांना श्रीवर्धन- दिवेआगर ची ओढ लागली आहे. सध्या दिवाळी सणाच्या नंतरच्या डिसेंबर एंडच्या सुट्ट्या संपवण्यासाठी पर्यटक येत आहेत. कोकणातील निसर्गाचा आनंद घेण्यासाठी विविध ठिकाणांहून पर्यटक कोकणातील विविध ठिकाणची व ऐतिहासिक ठिकाणे पाहण्यासाठी दाखल होऊ लागले आहेत. पावसाच्या मोसमात बंद असलेले समुद्रकिना-यावरील मजेशीर स्पोर्टस् पुन्हा सुरू झाले आहेत. विशेष म्हणजे यासोबतच दिवेआगर येथील प्रसिद्ध श्री गणेश सुवर्ण मुखवट्याचे दर्शन घेण्यासाठी गणेश भक्तांची संख्या वाढली आहे.

सुवर्ण गणेशाच्या आगमनाने दिवेआगर पर्यटन आता धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून वाढीस येत आहे. राज्यातील शिर्डी, पंढरपूर, गणपतीपुळे अशा प्रसिद्ध धार्मिक स्थळांचा दर्जा दिवेआगरला प्राप्त होत असल्याने फक्त आठवड्यातील विकेंडला होणारी गर्दी आता नेहमीच अनुभवता येत असल्याचे येथील व्यवसायीक सांगतात.

श्रीवर्धन तालुका हे पर्यटनदृष्ट्या विकसित होत चालले आहे. राजकारणाप्रमाणेच श्रीवर्धन पर्यटनदृष्ट्यादेखील जगाच्या नकाशावर येत आहे. तसेच तालुक्यातील विविध पर्यटन विकासासाठी कित्येक कोटी निधी आला आहे. श्रीवर्धन तसेच दिवेआगर समुद्रकिनारी वॉटर स्पोर्ट मध्ये बंपर टयुब राइड, बनाना बोट राइड इत्यादी खेळ आहेत.

हे पाण्यातील खेळ स. ८.३० ते सायंकाळी ६ वाजेपर्यत सुरू असतात. असा अनोखा आनंद घेताना भक्तजनांना येथील मंदिरांची भेट समाधानकारक ठरत आहे.

## अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालय येथे हृदयरोग तपासणी शिबीर संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

येथील जिल्हा रुग्णालय येथे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम, डि.ई.आय.सी. कार्यक्रम व एस.आर.सी.सी. हॉस्पिटल, मुंबई तसेच सत्य साई संजीवनी हॉस्पिटल, खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन शनिवार, दि. ११ डिसेंबर, २०२१ रोजी करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये हृदयविकार असणाऱ्या एकूण ४१ बालक/विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी २० बालक/विद्यार्थी यांना पुढील उपचारासाठी व शस्त्रक्रियेकरिता संदर्भित करण्यात आले आहे. या लाभार्थ्यांच्या शस्त्रक्रिया एस.आर.सी.सी. हॉस्पिटल, मुंबई व सत्य साई संजीवनी हॉस्पिटल खारघर येथे राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम व डि.ई.आय.सी. कार्यक्रमांतर्गत मोफत करण्यात येणार आहेत.

या शिबिराकरिता एस.आर.सी.सी. हॉस्पिटल, मुंबई येथील डॉ. स्नेहा जैन, कार्डिओलॉजिस्ट व सत्य साई संजीवनी हॉस्पिटल खारघर येथील डॉ. आशिष बनपूरकर यांच्यासह जनसंपर्क अधिकारी डॉ.प्रचिती, जिल्हा सामान्य रुग्णालयातील डि.ई.आय.सी. मॅनेजर श्री.गणेशकुमार भोसले, आरबीएसके समन्वयक श्री. सुनिल चव्हाण, सामाजिक कार्यकर्ता श्री. ज्ञानदीप भोईर, श्रीम.ऐश्वर्या थळे तसेच आरबीएसके पथकातील वैद्यकीय अधिकारी डॉ.संदेश, डॉ. निदा, डॉ. रश्मी व आरोग्य सेविका श्रीम. सई, स्वागता, प्रियांका हे उपस्थित होते.

हे शिबीर यशस्वी होण्याकरिता जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने यांच्या मार्गदर्शनाखाली निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. गजानन गुंजकर, अधिसेविका श्रीम. जयश्री मोरे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. चेतना पाटील, जिल्हा लेखा व्यवस्थापक श्री. संतोष पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## म्हसळा नगरपंचायत निवडणुक १२ जागांसाठी ३७ उमेदवार रिंगणात

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा नगर पंचायतीच्या १७ प्रभागातील सार्वत्रिक निवडणूकीसाठी नाम निर्देशन पत्र दाखल करून घेण्याचे काम पुर्ण झालेवर मा.उच्च न्यायालयाने ओबीसींचे आरक्षणाच्या जागेसाठी स्थगिती दिली असली तरी महाराष्ट्र राज्य निवडणूक निर्णय अधिकारी यांचे आदेशानुसार निवडणुकीची पुढील कार्यवाही सुरू आसुन म्हसळा नगर पंचायतीमध्ये १७ पैकी ४ प्रभागात ओबीसींना आरक्षित आहेत.

उर्वरित १३ प्रभागात निवडणूक कार्यक्रम सुरू असुन प्रभाग क्रमांक ४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची एक जागा बिनविरोध झाली आहे. दिनांक १३ डिसेंबर २०२१ रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी शेवटच्या दिवशी प्रभाग क्रमांक ५ मधील एक मेव उमेदवाराने नामनिर्देशन पत्र मागे घेतला असल्याने आता १२ जागांसाठी ३७ उमेदवार निवडणुक रिंगणात उभे असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी अमित शेडगे यांनी माहिती देताना सांगितले.

आज दिनांक १४ रोजी उमेदवारांना चिन्हे वाटप करण्यात येणार आसुन निवडणूक कार्यक्रमानुसार सर्व प्रकिया पार पडली जाणार असल्याचे सांगितले. ओबीसींच्या चार आरक्षित जागा वगळता निवडणूकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे १२ उमेदवार, काँग्रेसचे ६, शिवसेना ६, भाजप ७, शेकाप प्रणित ४ आणि अपक्ष ३ यांचा समावेश आहे. म्हसळा नगर पंचायतीमध्ये शिवसेना,काँग्रेस पक्षाची युती आहे तर राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप आणि शेकाप स्वबळावर निवडणूक लढवीत आहे. आज दिनांक १३ डिसेंबर रोजी ओबीसी आरक्षण स्थगिती बाबतचा निकाल मा.उच्च न्यायालया मार्फत जाहीर होणार असल्याचे समजते असे असले तरी नगर पंचायतीच्या उर्वरित जागांसाठी निवडणूक प्रकिया सुरळीतपणे सुरू आहे.

## पनवेल तालुका पोलिसांनी राबविलेल्या ऑल आऊट मोहिमेत वेगवेगळ्या अस्थापनाविरोधात कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुका पोलिसांनी मध्यरात्रीच्या सुमारास हद्दीत वेगवेगळ्या आस्थापाने व उद्योगधंदे, हॉटेल, लॉज आदींच्या विरोधात एकाच वेळी ऑल आऊट मोहिम राबवून मोठ्या प्रमाणात कारवाई केल्याने अनैतिक धंदे करणाऱ्यांचे तसेच शासनाचे नियम न पाळता व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

वरिष्ठ पोलिस निरीक्षक रविंद्र दौंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली ९ अधिकारी व ५० कर्मचाऱ्यांनी पनवेल तालुका पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वेगवेगळ्या ठिकाणी कारवाई एकाच वेळी केली. यात प्रामुख्याने कोन नाका परिसर व खारपाडा टोलनाका येथून ये-जा करणाऱ्या १३२ वाहनांची तपासणी करण्यात आली. त्याचप्रमाणे परिसरातील वेगवेगळे लॉजेस, बार, हॉटेल यांचीही तपासणी करण्यात आली. तसेच अवैद्ध दारूविक्री करणे, त्याची वाहतूक करणे, जवळ बाळगणे अशा प्रकारे तीन जणांवर कारवाई करण्यात आली आहे, तर गुटखा, तंबाखूजन्य पदार्थ जवळ विक्री करण्यास व जवळ बाळगण्यास बंदी असतानाही सदर नियम तोडणाऱ्या दोघांवर या पथकाने कारवाई केली आहे. त्याचप्रमाणे अभिलेखावरील चार आरोपींची तपासणी करण्यात आली आहे. १४ जणांवर समन्स बजावण्यात आला आहे. त्याचप्रमाणे अवैद्धरित्या मद्यविक्री, मटका जुगार चालणाऱ्या तिघांविरूद्ध कारवाई करून मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच गुन्हा करण्याच्या इराद्याने संशयितरित्या घुटमळणाऱ्या दोघांविरूद्धसुद्धा या ऑपरेशनमध्ये कारवाई करण्यात आली. पनवेल तालुका पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी नियंत्रणात येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## बोर्ली ग्रामपंचायतीत नेत्र चिकित्सा व आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील बोर्ली ग्रामपंचायत व मुंबई -खार(पश्चिम) येथील श्री रामकृष्ण मठ व मिशन हॉस्पिटल, अलिबाग येथील श्री रामकृष्ण विवेकानंद सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामपंचायत कार्यालयात मोफत नेत्र चिकित्सा व आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले.

या शिबिरात ग्रामपंचायत हद्दीतील लोकांची तज्ञ डॉक्टर व त्यांच्या टिमने कान, नाक, घसा व इतर आजारांबाबत मोफत आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी करण्यात येऊन चष्मे वाटप करण्यात आले.

शिबिराचा परीसरातील ३५० जणांनी लाभ घेतला.यावेळी मोतीबिंदू असणा-या ५८ जणांना लवकरच शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

**महाराष्ट्र शासन**
**कृषी विभाग**
**उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय, अलिबाग**
**शासकीय रोपवाटकी, वेश्वी, अलिबाग-पेण रोड, अलिबाग, जिरायगड**

दुरध्वनी क्र.०२१४१२२२३०८ Email : sdaoalibag@gmail.com

### ई निविदा सूचना क्र.०५/२०२१ सन २०२१-२२

उपविभागीय कृषी अधिकारी अलिबाग, जि.रायगड महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाकडून खुल्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरिता बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहोत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार उप विभागीय कृषी अधिकारी अलिबाग जि.रायगड यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

| अ.क्र. | ई निविदा सूचना क्र. | गावाचे नाव | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | ०५/२०२१ | गागोदे खु ता.पेण, जि.रायगड | सिमेंट नाला बांध गट क्र.१ | ९०४०३४/- |
| | | एकूण | | ९०४०३४/- |

ई निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक १४/१२/२०२१ ते दिनांक २८/१२/२०२१

निविदा पूर्व बैठक :- दिनांक १७/१२/२०२१ (बैठकीचे ठिकाण : उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय अलिबाग, जि.रायगड) वेळ : दुपारी १२.०० ते १३.०० वाजता

ई निविदा उघडणे :- दिनांक ३०/१२/२०२१

१३) http://mahatenders.gov.in

१४) सदर निविदे सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती व कार्यालयातील सुचना फलकावर कळविण्यात येईल.

१५) उपविभागीय कृषी अधिकारी अलिबाग कार्यालयातील सुचना फलकावर उपलब्ध आहे.

जा.क्र.उविकृअ/ईनिविदा/---/२०२१
उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय,
अलिबाग, जि.रायगड दिनांक : १०/१२/२०२१

**सही/-**
**उपविभागीय कृषी अधिकारी**
**अलिबाग जि.रायगड**

क्र.जिमाका/राअ/जाहि/१७३/२०२१-२२

मा.गोडसे साहेब

अ‍ॅड.हेमा भगत

### जाहीर नोटीस

पनवेल येथील सह दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, पनवेल
दि.चौ.अर्ज क्र.१७१८/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१४/०१/२०२२

१) श्रीमती.रेखा सुगंध पगारे
वय : वर्षे, व्यवसाय :
२) अर्चना सुगंध पगारे
वय : वर्षे, व्यवसाय : शिक्षण
३) कु.विशाखा सुगंध पगारे
वय : वर्षे, व्यवसाय : शिक्षण
४) कु.अतिश सुगंध पगारे
(अज्ञान पालक म्हणून आईची सही)
वय : १३ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
५) श्रीमती.गयाबाई काशिनाथ पगारे
वय : वर्षे, व्यवसाय : गृहिणी
सर्व रा.रुम नं.बी.१०१, विठोबा कॉम्प्लेक्स,
सुकापूर, नवीन पनवेल, ता.पनवेल, अर्जदार

**सदनिकेचे वर्णन**

| शहर | सदनिका क्र. | किंमत |
|---|---|---|
| पालीदेवद | सदनिका क्र.बी १०१, पहिला मजला, सर्व्हे नं.०८, हिस्सा नं.अ (३) पालीदेवद, ता.पनवेल | ३,५४,२००/- |
| कल्याण | रुम नं.३, चाळ नं.६, सर्व्हे नं.१३, हिस्सा नं.४, महाराल ता.कल्याण सदर गाळा साई श्रद्धा कन्स्ट्रक्शन | १,४०,०००/- |
| कल्याण | रुम नं.४, चाळ नं.६, सर्व्हे नं.१३, हिस्सा नं.४, महाराल ता.कल्याण सदर गाळा साई श्रद्धा कन्स्ट्रक्शन | १,४०,०००/- |

वरील सदरहू वरील अर्जदार क्र.१ ह्या श्री.सुगंध काशिनाथ पगारे यांच्या पत्नी आहेत व अर्जदार क्र.२ व ३ ह्या त्यांच्या मुली आाहेत व अर्जदार क्र.४ हा त्यांचा मुलगा आहे. अर्जदार क्र.५ ही त्यांची आई आहे. श्री.सुगंध काशिनाथ पगारे यांचे निधन दि.१४/२/२०२० रोजी एमजीएम हॉस्पिटल कामोठे, नवी मुंबई येथे झाले आहे. श्री सुगंध काशिनाथ पगारे यांच्या निधनाची नोंद पनवेल महानगरपालिकेमध्ये केलेली आहे. पनवेल महानगरपालिकेने त्यांच्या मृत्यूचा दाखला दिलेला आहे. सदर दाखला अर्जासोबत जोडलेला आहे.

वरील उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळविण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नाहीत असे कोणास समजविण्यो असेल आणि वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१३/१२/२०२१ रोजी सहीने व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या जिल्हा सचिवपदी कॉम्रेड रामचंद्र म्हात्रे यांची निवड

**दै.रायगड नगरी । उरण**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे १५ वे रायगड जिल्हा अधिवेशन रविवारी उरण येथील आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत सभागृहात पार पडले. या अधिवेशनात कॉम्रेड रामचंद्र म्हात्रे यांची पक्षाच्या रायगड जिल्हा सचिवपदी निवड करण्यात आली आहे.पक्षाच्या त्रैवर्षिक अधिवेशनाचे उदघाटन माकप चे महाराष्ट्र राज्य सचिव मंडळ सदस्य कॉम्रेड डॉ. एस. के.रेगे यांनी केले.

यावेळी त्यांनी पक्षाचे समतावादी समाजाच्या उभारणीचे उद्दिष्ट असल्याचे सांगून त्यासाठी जनतेच्या विविध घटकांना संघटीत करण्याचे काम करून, समाजाला एकजूट करण्याचे व धर्मांध व जातीयवादी शक्तींचा मुकाबला करण्याचे आवाहन केले. तसेच स्थानिक प्रश्नांवर आंदोलन उभारून जनतेला न्याय देण्यासाठी डाव्या व पुरोगामी विचारांचा पक्ष आणि संघटनांना सोबत घेऊन काम करण्याची सूचना केली.

अधिवेशनाच्या खुल्या सत्रात कॉम्रेड भूषण पाटील यांनी वर्षभर चाललेल्या विजयी शेतकरी आंदोलन करण्या लढाऊ शेतकरी व त्याचे नेतृत्व करणाऱ्या नेत्यांचा अभिनंदन करणारा प्रस्ताव मांडला. या अधिवेशनात महागाई,बेरोजगारी, शिक्षणाचा हक्क,रेशनिंग व्यवस्था बळकट करण्याचे त्याच प्रमाणे महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या संदर्भात ठराव मांडण्यात आले.सुरुवातीला पक्षाचे ज्येष्ठ नेते कॉम्रेड चंद्रकांत कोळी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर शहिदांच्या वेदीला पुष्पांजली वाहण्यात आली.

तर अधिवेशनात कॉम्रेड संजय ठाकूर यांनी चार वर्षाचा कार्याचा व संघटनात्मक अहवाल मांडला. या अहवालावर उपस्थित प्रतिनिधींनी चर्चा केली. ज्या मध्ये पक्ष संघटने विषयी काही सूचना करण्यात आल्या. अधिवेशन कॉम्रेड हेमलता पाटील,भास्कर पाटील व रविंद्र कासुकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.तर पक्षाचे ज्येष्ठ नेते किसन गुजर,प्राध्यापक तापी मुखोपाध्याय, प्राध्यापक मधु परांजपे यांनीही मार्गदर्शन केले.तसेच पुढील तीन वर्षांसाठी नवीन जिल्हा कमिटी ही निवडण्यात आली.

# पेट्रोल पंपावरील शौचालयाला ‘कुलूप’ ; वाहन धारकांचे हाल

**दै.रायगड नगरी । खोपोली**

पेट्रोल, डिझेलच्या किंमती आता सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेल्या आहेत. पण पेट्रोलशिवाय गत्यंतर नसलेल्यांना ते खरेदी केल्यावाचून दुसरा काही पर्याय देखील नाही. पण पेट्रोल किंवा डिझेल घेणाऱ्या ग्राहकांना पेट्रोल पंपावर काही सुविधा मोफत देणे अनिवार्य असताना खोपोली शहरातील पेट्रोल पंप चालक मनमानीपणे काम करीत आहेत. प्रत्येक पेट्रोल पंपावर ग्राहकांसाठी शौचालय असणे आवश्यक असताना खोपोली शिळफाटा येथील पेट्रोल पंपावर शौचालयाला कुलूप लावून ठेवल्याचा संतापजनक प्रकार दिसून आला. त्यामुळे मजबूरीत ग्राहकांना पेट्रोल पंपामागील जागेत उघड्यावर मूत्र विसर्जन करावे लागत आहे.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, शनिवार दि. ११ डिसेंबर २०२१ रोजी सायकांळी शिळफाटा येथील पेट्रोल पंपावर मोठी गर्दी होती. यातील अनेकांना लघुशंकेसाठी जायचे होते. पण पेट्रोल चालकाने शौचालयाला कुलूप लावून ठेवले आहे. ऐवढेच नव्हे तर याबाबत विचारले असता उडवाउडवीची उत्तरे दिली जात होती. त्यामुळे मजबूरीत ग्राहकांना पेट्रोल पंपामागील जागेत उघड्यावर मूत्र विसर्जन करावे लागत होते.

खोपोली शहरातील सर्वाधिक गर्दी असलेल्या शिळफाटा येथील या पेट्रोल पंपावर नेहमीच ग्राहकांना अडचणींचा सामना करावा लागतो. कधी शौचालयाला कुलूप लावून बंद केले जाते, तर कधी ऑनलाईन पेमेंट बंद असते. कधी-कधी फ्रिची हवा भरण्यास मुलगाच जागेवर नसतो. त्यामुळे या पेट्रोल पंप चालकांवर कुणाचा अंकुश आहे की नाही, असा प्रश्न ग्राहकांना पडला आहे.

पेट्रोल पंपावर ग्राहकांना काही सुविधा मोफत देणे अनिवार्य असते. त्यात पेट्रोल पंपावर वाहनात पेट्रोल भरल्यानंतर वाहनाच्या टायरमध्ये मोफत हवा भरता येते. पेट्रोल पंप चालकाने वाहनचालकांसाठी ही सुविधा मोफत उपलब्ध करुन देण्याचा नियम आहे. त्यासाठी ग्राहकांकडून कोणतेही शुल्क आकारले जाऊ शकत नाही.

पेट्रोल पंपावर स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा असणे किंवा ती व्यवस्था करुन देणे पेट्रोल पंप मालकासाठी अनिवार्य आहे. पेट्रोल पंपावर शौचालयाची सुविधा अनिवार्य आहे. ही सुविधा ग्राहकांसाठी मोफत असावी यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाऊ शकत नाही. पंप मालकाने याची काळजी घेणे बंधनकारक आहे. यासोबत पेट्रोल पंपावरील शौचालये स्वच्छ आणि सुयोग्य असावीत. यात कोणत्याही प्रकारची अडचण ग्राहकांना येत असेल तर त्यांना तक्रार करण्याचा अधिकार आहे आणि पेट्रोल पंप मालकाने त्यावर स्पष्टीकरण देणे कर्तव्य आहे. आपत्कालीन परिस्थितीत कुणाला फोन करायचा असेल तर पेट्रोल पंपावर टेलिफोनची व्यवस्था असणे पेट्रोल पंप मालकांना बंधनकारक आहे. ‘फर्स्ट एड बॉक्स’ म्हणजेच प्राथमिक उपचार कीट पेट्रोल पंपावर उपलब्ध असणे बंधनकारक आहे. यात प्राथमिक उपचारासाठीची काही औषधे, उपकरणे यांचा समावेश असतो. प्रत्येक पेट्रोल पंप मालकाला ही सुविधा मोफत देणे अनिवार्य आहे. पेट्रोल पंपावर दिल्या जाणाऱ्या पेट्रोलची गुणवत्ता चाचणी करण्याचाही ग्राहकाला अधिकार आहे. यात ग्राहक गुणवत्तेसोबतच प्रमाणाचीही तपासणी करू शकतो किंवा त्याची विचारणा करू शकतो. याशिवाय पेट्रोल पंपावर आणखी काही सुरक्षेच्या दृष्टीकोनातून गोष्टी उपलब्ध असणे अनिवार्य आहे. यात आग विझवण्यासाठी लागणारी उपकरणे जसे की फायर सेफ्टी स्प्रे, रेतीने भरलेल्या बादल्या यांचा समावेश आहे. खोपोलीतील पेट्रोल पंपावर या सुविधांचा अभाव दिसून येतो. त्याचप्रमाणे डिजिटल पेमेंटबाबत नेहमीच ग्राहकांना अडचणींचा सामना करावा लागत असतो.

# नवीन दागिने बनवून न देता फसवणूक करणाऱ्या आरोपीला राजस्थान येथून अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सोन्याचे नवीन दागिने बनवून न देता त्यांचा अपहार करून फसवणूक केल्याचा प्रकार पनवेल येथे घडला होता. यातील आरोपीला पनवेल शहर पोलिसांनी राजस्थान येथून अटक केली आहे.

२०१८ मध्ये शिरढोण येथील मनोज हरिभाऊ महाडिक यांनी कर्नाळा बँकेसमोर उरण नाका येथील महालक्ष्मी ज्वेलर्सकडे ३ लाख १५ हजार रुपयांचे सोने दिले व त्या बदल्यात नवीन सोने बनवण्यासाठी सांगितले. मात्र त्याने महाडिक यांच्याकडून सोने घेऊन नवीन दागिने बनवले नाहीत. व सोन्याचा अपहार करून त्यांची फसवणूक केली. त्यानंतर रोशन गोपीलाल प्रजापती (३६) हा ज्वेलर्स दुकान बंद करून पळून गेला. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक मनोज महाडिक, सहाय्यक फौजदार संजय धारेराव, पोलीस हवालदार यशवंत भोसले, पोलीस नाईक परेश म्हात्रे याना तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपी राजस्थान येथे असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार त्यानी राजस्थान येथे जाऊन तपास केला आणि आर-ोपी रोशन गोपीलाल प्रजापती याला ताब्यात घेतले. त्याने आत्तापर्यंत १८ लाख ४६ हजारांची फसवणूक केल्याचे उघड झाले आहे.

# पळस ग्रामपंचायतीच्या प्रभारी सरपंचपदी चंद्रकांत भालेकर

**दै.रायगड नगरी । नागोठाणे**

गेली अनेक वर्षे राष्ट्रवादी काँग्रेसची निर्विवाद सत्ता असलेल्या नागोठणे विभागातील पळस ग्रामपंचायतीच्या सरपंच परीक्षा विक्रांत घासे या प्रसुती रजेवर गेल्याने रिक्त झालेल्या जागेवर जेष्ठ नेते शिवरामभाऊ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली उपसरपंच चंद्रकांत कृष्णा भालेकर यांची प्रभारी सरपंचपदी निवड करण्यात आली. दरम्यान आपले नेते खा. सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पालकमंत्री ना. अदितीताई तटकरे व आमदार अनिकेतभाई तटकरे यांच्या सहकार्याने आपल्या पळस विभागात विकासकामांचा झंझावात सुरु असून यापुढेही आपल्याला विविध विकास कामे करायची आहेतच परंतु आपण सर्वांनी एकत्र असणे गरजेचे आहे तसेच प्रभारी सरपंच चंद्रकांत भालेकर यांनी आपल्या ग्रामपंचायत हद्दीत अधिकाधिक विकासकामे कसे होतील याकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे असे बहुमोल मार्गदर्शन यावेळी राष्ट्रवादीचे विभागीय जेष्ठ नेते शिवरामभाऊ शिंदे यांनी केले.

पळस ग्रामपंचायतीची मासिक सभा सोमवार दि. १३ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता खेळीमेळीच्या वाता-वरणात पार पडली. या मासिक सभेत उपसरपंच चंद्रकांत भालेकर यांची प्रभारी सरपंचपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नागोठणे विभागीय नेते भाई टके, शिवरामभाऊ शिंदे, विक्रांत घासे, माजी सरपंच हिराजी शिंदे, महादेव डाकी, रामचंद्र कदम, जोमाशेठ तांबोळी, गजानन भोईर, अशोक शिर्के, नितीन राजिवले, केशव शेलार, संतोष भालेकर, योगेश विचारे, किशोर किरगन, परशुराम तांबोळी, हिराजी शेलार, बबन भालेकर, अशोक शिर्के, किशोर शेलार, गोविंद पवार, हरी पवार, मिलिंद डाकी, ग्रामपंचायत सदस्य किसन बोरकर, निष्ठा विचारे, सतिश डाकी, पप्पु वाघमारे, सुरेखा नाईक, उषा साळुंखे, सुप्रिया डाकी, ग्रामसेविका कांचन राऊत आदींसह ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.



# कोरोना नियमांची सूट; पर्यटनस्थळे व सागरी किनाऱ्यावर पर्यटकांची मौजमस्ती आणि लयलूट



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

रायगड जिल्ह्यातील मनमोहक सागरि किनाऱ्याची ओढ सार्यानाच आहे. निसर्ग सौन्दर्याची भुरळ व आकर्षण साऱ्यांनाच आहे. विस्तीर्ण २४० किमीचा समुद्र किनारा, प्रसिद्ध किल्ले, ऐतिहासिक व धार्मिक स्थळे, निसर्गसोंदर्य यामुळे रायगड जिल्ह्याला पर्यटकांची नेहमीच पसंती असते. येथील बहुसंख्य आर्थिक गणिते पर्यटनावरच अवलंबून आहेत. मात्र कोरोनामुळे मागील पावणे दोन वर्षे येथील पर्यटन व्यवसाय पूर्णपणे ठप्प झाला होता. येथील आर्थिक घडी विस्कळीत झाली होती. सध्या कोरोनाचे सावट धूसर झाले आहे. त्यात अनेक नियम शिथिल केले गेले आहेत. परिणामी विकेंड सुट्ट्यांमध्ये येथील सर्व पर्यटनस्थळे हाऊसफुल होत आहेत. त्यामुळे छोटे मोठे व्यवसायिक व उद्योजक सुखावले आहेत. यंदा राहण्या-खाण्याचे दर स्थिर आहेत. त्यामुळे पर्यटकांचा आनंद द्विगुणीत झाला आहे. पर्यटनस्थळे हाऊसफुल झाल्याने स्थानिकांच्या रोजगाराला चालना मिळालीय. तसेच लहानमोठे व्यवसायिक यांचा धंदा ही तेजीत सुरू आहे. शिवाय आता कोरोनाचे भय लोकांच्या मनात आहे की नाही हा मोठा प्रश्न आहे, कारण पर्यटक मास्क तर नाहीच कोणतेच नियम पाळताना दिसत नाहीत, याकडे प्रशासनाने लक्ष देण्याची गरज निर्माण झालीय. ओमीक्रोन विषाणू ला रोखायचे असेल तर काळजी व खबरदारी घेतलीच पाहिजे.

पुणे-मुंबईसह महाराष्ट्र व राज्याबाहेरील निरनिराळ्या ठिकाणच्या पर्यटकांची पावले जिल्ह्यातील पर्यटन स्थळांकडे वळली आहेत. सर्व ठीकाणी पर्यटकांची गर्दी आहे. यामुळे पर्यटनावर अवलंबुन असलेले हॉटेल व्यावसायिक, खाना-वळी, छोटे-मोठे दुकानदार, वाहतूकदार, राईड्सवाले यांची सध्या चलती आहे. अलिबाग- नागाव, वरस-ोली, मुरुड- काशिद, श्रीवर्धन- दिवेआगर, हरिहरेश्वर येथील समुद्रकिनारे पर्यटकांना भुरळ घालत आहे. येथे विविध राईडचा आनंदही ते घेत आहेत. माथेरान हे थंड हवेचे ठिकाण म्हणुन सर्वत्र परिचित आहे. नोव्हेंबर महिना उजाडला तरी अजुन काही उन्हाची काहीली कमी होतांना दिसत नाही. त्यामुळे वाढत्या उन्हाच्या कडाक्यात गारवा घेण्यासाठी माथेरानमध्ये पर्यटकांची रेलचेल पहायला मिळत आहे. आठवड्या भरापासुनच येथील काही हॉटेल व लॉज बुक झाले असले तरी येणार्या पर्यटकांची कोणतीच गैरसोय होणार नाही याची काळजी येथील व्यावसायिक घेत आहेत.

अष्टविनायकांपैकी दोन गणपती हे रायगडमध्ये आहेत. ते म्हणजे खालापुर तालुक्यातील महडचा वरदविनायक आणि सुधागड तालुक्यातील पालीचा बल्लाळेश्वर, सध्या येथे भाविकांची दर्शनासाठी रीघ लागलेली आहे. शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड किल्लयावर पर्यटक मोठया संख्येने येत आहेत. समुद्रातील मुरुड जंजिरा व अलिबागचा कुलाबा किल्ला व उरण जवळील घारापुरी/अजंठा लेणी पाहण्यासाठी प्रचंड गर्दी होत आहे. येथिल नगरपालिका, नगरपरिषदा, व ग्रामपंचायतींच्या उत्पन्नात पर्यटक करामुळे भरघोस वाढ होण्याची शक्यता आहे.

या वर्षी हॉटेल व खाणावळीतील जेवणाच्या व राहण्याच्या दरात यंदा जास्त वाढ झाली नाही. माथेरानमध्ये एका जोडप्यासाठी एक दिवस-रात्रीसाठी एक हजार ते दीड रुपये साध्या खोलीसाठी तर दोन ते चार हजार एसी रुमसाठी भाडे आहे. अलिबाग व मुरुड तालुक्यात चार व्यक्तींना राहण्याचा दर एक दिवस-रात्रीसाठी साधारण खोली करिता १००० रुपये तर एसी व टिव्ही असलेल्या खोलीकरीत ४००० पर्यंत आहे. तर हरिहरेश्वर, दिवेआगर व श्रीवर्धन येथे साधारण खोली करीता १००० ते १५०० तर एसी व टिव्ही असलेल्या खोली करीता २२०० रुपयांपासुन पुढे आहे. बहुतांश ठिकाणी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या हॉटल मध्ये राहण्याची व जेवणाची व्यवस्था आहे. ग्राहकांच्या सोयीसाठी अनेक ठिकाणी राहण्याच्या दरामध्ये कपात केली जाते. तर विविध ऑफर देखील दिल्या जात आहेत.

अलिबाग- नागाव, वरसोली, मुरुड- काशिद, श्रीवर्धन- दिवेआगर, हरिहरेश्वर येथील समुद्रकिनारे पर्यटकांना भुरळ घालत आहे. हे सर्व समुद्र किनारे पर्यटकांनी हाऊसफुल्ल झाले आहेत. किनार्यांवर बोटींग, घोडागाडी, बनाना, बाईक राईडची पॅरा ग्लायडिंगची मजा पर्यटक लुटत आहेत. यांचे दर देखील स्थिर आहेत.

### लोकन्यायालयात तब्बल १५ हजार 300 प्रकरणे सामंजस्याने मिटवून पक्षकारांना

# पक्षकारांना १६ कोटी रूपयांची तडजोड रक्कम मिळवून देण्यात रायगड विधी प्राधिकारणास यश

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

न्यायालयात वर्षानुवर्षे वाद करीत बसून वेळ, पैसा आणि ताकद खर्च करण्यापेक्षा दोन्ही पक्षांनी सामंजस्याची भूमिका घेवून लोक न्यायालयात समेट घडवावा, असा प्रवाह भारतीय न्यायालयाच्या इतिहासात गेल्या दशकात प्रकर्षाने रूढ झालेला आहे.

याच पार्श्वभूमीवर काल (दि.११ डिसेंबर) रोजी अलिबाग येथे झालेल्या लोकन्यायालयात तब्बल १५ हजार ३०० प्रकरणे सामंजस्याने मिटविण्यात आली आहेत. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय दिल्ली यांच्या निर्देशाप्रमाणे संपूर्ण भारतभर दि. ११ डिसेंबर २०२१ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे तसेच न्यायालयात दाखल होण्यापूर्वीची प्रकरणे ठेवण्यात आली होती.

रायगड जिल्ह्याच्या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती विभा प्र. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यात आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये रायगड जिल्ह्यातील दाखलपूर्व व प्रलंबित अशी एकूण १६ कोटी ७४ लाख ७७ हजार ०८९ रुपये मूल्य असलेली १ लाख २ हजार २५० प्रकरणे लोक अदालतीमध्ये ठेवण्यात आली होती.

त्यापैकी दाखलपूर्व ९३ हजार १७८ प्रलंबित प्रकरणापैकी ६ कोटी ९८ लाख ९१ हजार ७७६ रुपये मूल्य असलेली १४ हजार ४२५ प्रकरणे तसेच दाखल झालेली ९ हजार ०७२ प्रलंबित प्रकरणापैकी ९ कोटी ७५ लाख ८५ हजार ३१३ रुपये मूल्य असलेली ८७५ प्रकरणे अशी एकूण १ लाख २ हजार २५० पैकी १५,३०० प्रकरणे सामंजस्याने मिटवून लोक अदालतीमध्ये निकाली निघाली व त्यातून पक्षकारांना एकूण १६ कोटी ७४ लाख ७७ हजार ०८९ रूपयाची तडजोड रक्कम मिळवून देण्यात आली.

जिल्ह्यातील विविध न्यायालयात लोक अदालती कक्ष स्थापन करण्यात आले होते. या लोक अदालतीमध्ये पक्षकारांना न्यायालयात येण्याची सक्ती न करता व्हिडीओ कॉलचा वापर करूनदेखील काही प्रकरणे मिटविण्यात आली. या लोक न्यायालयाला यशस्वी करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद,रायगड, पोलीस अधीक्षक कार्यालय विधीज्ञ, सर्व पक्षकारांनी भरघोस प्रतिसाद दिल्याबद्दल जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती विभा इंगळे व न्यायाधीश तथा विधी प्राधिकरणाचे सचिव श्री.संदीप स्वामी यांनी सर्वांचे आभार मानले आहेत.

# सीकेटी महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार; मान्यवरांची उपस्थिती




**दै.रायगड नगरी । पनवेल**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) स्वायत्त महाविद्यालयात शनिवारी (दि. ११) गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संस्थेचे स्फूर्तिस्थान स्व. चांगू काना ठाकूर यांच्या पुण्यस्मरण दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आला होता.

संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून मुंबईतील डीएव्ही कॉलेजचे प्राचार्य आणि मुंबई विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे अधिष्ठाता डॉ. अजय भामरे, मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव सुधीर पुराणिक, तर प्रमुख मान्यवर म्हणून संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, महापौर डॉ. कविता चौतमोल, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य नगर-सेवक अनिल भगत, ॲड.विनायक कोळी, नगरसेवक संतोष शेट्टी, एकनाथ गायकवाड, नगरसेविका सीता पाटील, हेमलता म्हात्रे, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे आदी उपस्थित होते.

या वेळी प्रमुख अतिथींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आयुष्यात खूप मोठे व्हा. संधी तुमचा दरवाजा एकदाच ठोठावते. त्याचे सोने करा, असे आवाहन केले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अध्यक्षीय भाषणात पारितोषिकप्राप्त विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या सोहळ्यात पारितोषिकप्राप्त विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. या वेळी सर्व पालक व गुणवंत विद्यार्थ्यांचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांनी कौतुक केले.

सोहळ्याचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. आर. व्ही. येवले, प्रा. डॉ. जी. एस. तन्वर, प्रा. ए. व्ही. पाटील यांनी केले. सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी परिषद व विद्यार्थी कल्याण कक्षाच्या अध्यक्ष डॉ. एम. ए. म्हात्रे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव यांनी विशेष परिश्रम घेतले.